# ॥ श्रीगुरुचरित्र शब्दार्थ चर्चा ॥

## अध्याय दुसरा (शिष्य दीपकाख्यान)

नमस्कार,

श्रीगुरुचरित्रातील ओव्यांचा योग्य अर्थ प्रयत्न :-

वाचकांनी समर्पक मते कारणमीमांसेसहित

pratisaadasg@gmail.com वर

आपल्या नाव पत्त्यासहीत कळवावीत ही विनंती.

कळावे,

'श्रीगुरुचरित्र आशय – निधी'

**ओवी क्रमांक : ९७ , १०१, १२९ , १३०**

**१९८ , २००, २२४**

# ओवी क्रमांक ९७

पंचाशत भूमंडळांत। भरतखंडी पुण्य बहुत।

मातें मारितील देखत। कैसा जाऊं म्हणतसे॥९७॥

**अर्थ:**

पाचशे भूमंडळाळांतील भरतखंडात पुण्य खूप आहे. माझ्यासारख्याला पाहून ते मला (कलियुगाला) मारतील (तर त्याठिकाणी मी ) कसा जाऊ ?" असे म्हणाला.

**पोथीमध्ये**

'पंचाशत भूमंडळ' या शब्दाचा अर्थ :-

भूमंडळाचें क्षेत्रफळ पन्नास कोटि योजनें असे पुराणांत सांगितलें आहे; "पंचाशत्कोटिविस्तारा सेयमुर्वी महामुने" – (इति विष्णुपुराणे)

पंचाशत म्हणजे पाचशे भूमंडळातील भरतखंडात खूप पुण्य आहे. येथे ‘भूमंडळ’ या शब्दातील भू म्हणजे जमीन व मंडळ म्हणजे गोल. ह्याचा अर्थ जमीनीचा गोल व त्यावरील भरत खंड. अर्थातच भरतखंडामुळे हा जमीनीचा गोल म्हणजे आपली पृथ्वी हा ग्रह. असे पाचशे ग्रह त्याकाळी माहित झाले असावेत, असे दिसते. परंतू ह्या पाचशे ग्रहांच्या आकड्याचा प्राचीन पुरावा आम्हाला मिळालेला नाही.केपलर १८६ एफ : पृथ्वीसदृश्य, मानवी वास्तव्यास योग्य ग्रह, पृथ्वीपासून ५०० प्रकाशवर्षे दूर असलेल्या, हंस तारकासमूहात नासाला दुर्बीणीच्या सहाय्याने ( ह्या वर्षी २०१४ साली) दिसलेला आहे.

## ओवी क्रमांक १०१

उपद्रविती मातें बहुत। कृपा न ये मज देखत।

जे जन शिवहरि ध्यात। धर्मरत मनुष्य देखा॥ १०१ ॥

**अर्थ:**

ते मला पुष्कळ उपद्रव देतात. मला पाहून त्यांना दया येत नाही. जे लोक शिवविष्णुचे ध्यान करतात, (त्यांच्यात मला) धर्मात रममाण होणारा माणूस दिसतो.

## संशोधकांच्या मते,

## शिव किंवा रुद्र : सिंधू संस्कृतीतील दैवत

प्राचीन काळी, पणी लोकांच्या, सिंधू संस्कृतीत शिव किंवा रुद्र हा देव लिंग किंवा पिंड स्वरुपात पूजित असत. हेच दैवत आर्यांच्या वैदिक संस्कृतीने दुष्टांचा

संहार करुन सुष्टांचे पालन करणारा देव म्हणून स्वीकारला. ह्या शिव किंवा महादेवाचे वैदिक काळातील स्वरुप गोरा वर्ण, पाच तोंडे, गळ्यात सर्प, भस्मांकित असे (श्रीगुरुचरित्र अध्याय पहिला मध्ये असलेल्या वर्णनाप्रमाणे ) होते.

## विष्णु : वैदिक संस्कृतीतील दैवत

प्राचीन आर्य लोकांच्या वैदिक संस्कृतीतील विष्णुचे माहात्म्य गरुडपुराण,विष्णुपुराण, नारदपुराण, भागवत ह्या ग्रंथांमधून सांगितलेले आहे. श्रीगुरुचरित्र अध्याय पहिला मध्ये केलेले विष्णुचे सगुण, नयनमनोहर, आपल्यासारखेच वाटणारे स्वरुप लोकांना जास्त भावले.

## ओवी क्रमांक १२९

ऐकोनि  कलीचें वचन। ब्रह्मा सांगतसे आपण।
'ग' कार म्हणजे सिद्ध जाण। रेफः पापस्य
दाहक॥ १२९॥

**अर्थ:**

कलीचे बोलणे ऐकून ब्रह्मा, आपण सांगितले, "ग शब्दाचा अर्थ सिद्ध जाण, र कार  हा पापांना जाळणारा ,

'ग ' शब्दाचा अर्थ सिद्ध जाण :

भारतीय तत्वज्ञानानुसार या ब्रह्मांडातील सर्व चेतन प्राणिमात्रांची आणि अचेतन वस्तुंची निर्मिती याला एकमेव कारण ब्रह्मन्  आहे.

यामुळे ओवी क्रमांक १३० मध्ये श्रीगुरुचरित्रकार श्रीगुरु शब्दाचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगतात

**ओवी क्रमांक १३०**

'उ' कार विष्णु अव्यक्त। ब्रह्मा रुद्र गुरु निश्चित।
त्रितयात्मक श्रीगुरु सत्य। म्हणोनि सांगे
कलीसी ॥ १३० ॥

**अर्थ:** 'उ कार' विष्णू अदृश्य. ब्रह्मा व रुद्र हे केवळ स्वतः गुरु निश्चित आहेत. तीन आत्मक असणारे श्रीगुरुचे रूप सत्य आहे." असे म्हणून कलिला सांगितले.

**ह्याचाच अर्थ 'ग ' म्हणजे ब्रह्मा होय.**

## ओवी क्रमांक १९८

पाप जेथें असे बहुत। दैन्य मात्सर्यसहित वसत।
शुभाशुभ नेणे क्वचित। पापरुप तें जाणावें॥ १९८॥

**अर्थ:** पाप जेथे पुष्कळ असते, तेथे पापाबरोबर मत्सर, द्वेष या विकारांनी युक्त दैन्य सख्यासारखे रहाते. शुभ अशुभ क्वचित तेथे पोचते. ते पापरुप असते हे जाणावे.

मात्सर्यसहित : मत्सर, द्वेष या विकारांनी युक्त.

पापाबरोबर असणारे दैन्य दीनवाणे न रहाता, मत्सर, द्वेष या सूड बुद्धी विचारांनी विनाशकारी होते.

## ओवी क्रमांक २००

समस्त रोग असती देखा। कुष्ठह्रसोळा भाग नव्हती का।

वेदधर्म द्विज ऐका ।कष्टतसे येणेंपरी॥२००॥

**अर्थ:** सगळे रोग असलेले दिसतात पण ते कुष्ठरोगाच्या सोळाव्या भागा इतकेही नाहीत, अशाप्रकारे वेदधर्म हा ब्राह्मण दुःखी झाला, ते ऐका.

कुष्ट रोग म्हणजे कोढ रोग, रक्त पिती

प्राचीन पुराण काळात, एडस् सारखे भयानक रोग दिसत नाहीत. कारण सर्वांत भयानक रोगाचे वर्णन कुष्ठ रोग म्हणून केलेले आढळते.

## ओवी क्रमांक २२४

अनेक दिव्य  सहस्त्रवर्षीं। तप करिती महात्रऋषि।

वर मागती अहर्निशीं। नाना कष्ट करोनियां॥ २२४॥

# अर्थ

हजारो वर्षे, अनेक प्रकारचे  असामान्य तप महात्रऋषी करतात, रात्रंदिवस नाना (प्रकारचे) कष्ट  करुन वर मागतात.

दिव्य= लोकोत्तर, असामान्य

अहर्निशी= रात्रंदिवस

सहस्त्र= हजार

# मुक्त ज्ञानकोश विकिपीडिया :-

विष्णु पुराणनुसार काल-गणना विभाग, विष्णु पुराण भाग १, तृतीय अध्याय प्रमाणे

**360 मानव वर्ष = एक दिव्य वर्ष**

4,800 दिव्य वर्ष = 1 कृत युग

3,600 दिव्य वर्ष = 1 त्रेता युग

2,400 दिव्य वर्ष = 1 द्वापार युग

1,200 दिव्य वर्ष = 1 कलि युग

12,000 दिव्य वर्ष = 4 युग = 1 महायुग

= (1 दिव्य युग )